आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
२८, क्वीन्स गार्डन, जुने सर्किट हाऊस जवळ,
पुणे-४११००१

दुरध्वनी- ०२० -२६३६०९४१

महाराष्ट्र शासन

E-mail:trti.mah@nic.in
Website: trti.maharashtra.gov.in

जा.क्र. आसंप्रसं/२०२४-२५/स्पर्धा परीक्षा/का- ४/ २५५३ दिनांक : ३०|८|२०२४

**प्रसिद्धीपत्रक-१**

**विषय: टीआरटीआय, बार्टी, सारथी आणि महाज्योती द्वारे स्पर्धात्मक परीक्षा पूर्व-प्रशिक्षण योजना - 2024-25 साठी आयोजित केलेल्या सामायिक प्रवेश परीक्षांमध्ये प्राप्त झालेले गुण पाहण्याची सोय उपलब्ध करून देणेबाबत**

**व**

**परीक्षांमधून वगळलेल्या प्रश्नांबाबत व एकाहून अधिक पर्याय योग्य असलेल्या प्रश्नांबाबत करण्यात आलेल्या कार्यवाही बाबत**

महाराष्ट्र राज्यातील बार्टी, सारथी, महाज्योती आणि टीआरटीआय या संस्थांच्या लाभार्थी गटांकरिता राबविण्यात येणाऱ्या स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम २०२४-२५ संबंधित विविध योजनांच्या लाभार्थी निवडीकरिता सर्वंकष धोरणांतर्गत सामायिक प्रवेश परीक्षांचे (Common Entrance Tests) आयोजन पहिले सत्र - दि. ३० जुलै ते १ ऑगस्ट २०२४ व दुसरे सत्र - दि. १० ऑगस्ट २०२४ ते १६ ऑगस्ट २०२४ या कालावधीत करण्यात आले होते. या परीक्षांमधील प्रश्न/उत्तरे संदर्भात answer key/response sheet आणि आक्षेप नोंदविण्यासाठीची सुविधा challenge portal द्वारे दि. २० ऑगस्ट ते २२ ऑगस्ट २०२४ (पहिल्या सत्राकरिता) व दि. २८ ऑगस्ट ते ३० ऑगस्ट (दुसऱ्या सत्राकरिता) उपलब्ध करून देण्यात आले होते.

प्राप्त आक्षेपांच्या पडताळणीअंती जे प्रश्न चुकीचे असल्याचे (Question is wrong or Ambiguous) आढळून आले असतील ते वगळण्यात येत असून ज्या batch/शिफ्ट मधील प्रश्नपत्रिकेतील प्रश्न वगळण्यात आला/आले असतील त्यांचे गुण (Obtained Marks) हे पुढे दिलेल्या सूत्रानुसार परिगणित केले जातील.

$$\text{Obtained Marks (Pro-rata score)} = \frac{\text{Total marks received for each correct answer}}{\text{Highest marks possible after omission of wrong questions}} \times 100$$

तसेच, ज्या प्रश्नांच्या संदर्भात एकाहून अधिक पर्याय योग्य उत्तर दर्शवित असल्याचे आढळल्यास योग्य उत्तर दर्शविणारा कोणताही पर्याय उमेदवाराने निवडला असल्यास त्या उमेदवाराला सदर प्रश्नाचे गुण देण्यात येतील.

उमेदवारांना त्यांच्या निकालाची प्रत Result Web Copy द्वारे उपलब्ध करून देण्यात येईल ज्यामध्ये उमेदवाराचे वरीलप्रमाणे Obtained Marks तसेच Percentile Score (सामान्यीकृत गुण) यांचा अंतर्भाव असेल. परीक्षा निहाय अंतिम गुणवत्ता याद्या या सामान्यीकृत गुणांनुसार (Percentile Score) संबंधित संस्थेमार्फत प्रसिद्ध केल्या जातील. तरी सर्व उमेदवारांनी याची नोंद घ्यावी.

(डॉ. राजेंद्र भारुड, भा. प्र. से.)
**आयुक्त तथा अध्यक्ष** (स्प.प.अं.व स.समिती),
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे